CMYK

बीड । बुधवार

०९.०४.२०२५

वर्षे : ५ अंक : १०

किंमत : ३ रू. पाने : ४

दैनिक ● www.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

■ संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ■




dailymarathwadapatra2021@gmail.com RNI:Reg.NO.MAH/MAR/2021/80074 Post:Reg.No.L/226/RNP/Renewal/2025-2027 Mob:9822152955 

# सोनं मोडीत काढण्यासाठी घाई

## सराफा दुकानांमध्ये ग्राहकांची गर्दी, नेमकं काय झालं?

**मुंबई । प्रतिनिधी**

सोने लवकरच लाखाचा टप्पा पार करणार असल्याची शक्यता गेल्या काही दिवसांमध्ये व्यक्त केली जात होती. मात्र गेल्या तीन दिवसांपासून सोन्याच्या दरात घसरण सुरु झाली आहे. सोनं ५५ हजार रुपये तोळं होणार या अफवेमुळं ग्राहकांनी दागिने विकायला सुरुवात केली आहे. सराफा पेढ्यांवर सोनं खरेदी करणा-यांऐवजी विकणारे ग्राहक जास्त दिसू लागले आहेत.



सोन्याचा भाव ५५ हजार रुपये तोळ्यांवर येणार ?घसरणीच्या भीतीनं सोनं मोडीत काढण्याची घाई, अफवेमुळं ग्राहकांकडून सोनं विक्री- ९४ हजार रुपये तोळं किमतीला पोहचलेलं सोनं गेल्या काही दिवसांपासून उतरणीला लागलं आहे. सोन्याच्या किंमतीत अचानक घसरण होऊ लागली आहे. सोन्याचा भाव ५५ हजार रुपये तोळे एवढा होणार अशी चर्चा सुरु झाली आहे. या चर्चेची लोकांनी एवढी धास्ती घेतलीये की सुवर्णनगरी जळगावमध्ये लोकांनी दागिने मोडण्यास सुरुवात केली आहे. आता जेवढा भाव आहे तेवढा भाव मिळाली तरी काही पैसे मिळतील अशी भावना असल्यानं लोकांनी तयार केलेले दागिने मोडण्यास सुरुवात केली आहे.

सोन्याचा भाव एक लाख रुपयांवर जाईल या आशेनं अनेकांनी पूर्वीच सोनं खरेदी केली. त्यांना आता सोन्याच्या भावात घसरण झाल्यानं सोनं विक्री करायला सुरुवात केलीय असं दुकानदार सांगतात. एकाचवेळी शेअर मार्केट कोसळणं आणि सोन्याच्या भावात घसरण होणं असं सहसा होत नाही. पण काही जागतिक घडामोडींमुळं सोनं घसरणीला लागल्याचं तज्ज्ञ सांगू लागले आहेत.

सोन्याचे दर का घसरले ? सोन्याचं उत्पादन मोठ्या प्रमाणात वाढलं, ऑस्ट्रेलियानंही सोन्याचं उत्पादन वाढवलं, रिसायकल सोन्याचा पुरवठा देखील वाढला, केंद्रीय बँकांकडून १ हजार ४५ टन सोने खरेदी, ७१ केंद्रीय बँका सोने साठा कमी करु शकतात, त्यामुळं सोन्याचे भाव घसरणीला लागल्याचं सांगण्यात येत आहे. पण सोनं ५५ हजार रुपये तोळ्यावर येण्याची शक्यता फारच कमी असल्याचा दावा तज्ज्ञ करत आहेत. सोनं खरेदी ही गुंतवणूक कायम चांगला नफा देणारी ठरली आहे. यावेळी सोन्याच्या भावात झालेली घसरणही ग्राहकांच्या पथ्यावर पडेल असं सांगण्यात येत आहे. फक्त सोन्याचा ५५ हजार रुपयांपर्यंतचा घसरणीचा अंदाज खरा ठरणार का याबाबत उत्सुकता कायम आहे.

# धारुर मध्ये मुलभूत सुविधांचा अभाव,मग सक्तीची वसुली का ?

**विश्वास शिनगारे**

सर्वत्र घाणीचे साम्राज्य,तुबलेली गटारे,खड्डेयुक्त रस्ते महिन्यातून तीन-चार वेळेस नळाला पाणी असा एक ना अनेक सुविधा नावलाच असल्याने व मूलभूत सुविधापासुन शहरातील नागरिक वंचित असल्याने

मालमत्ता कर का भरावा असा प्रश्न शहरातील सर्व सामान्यांना नागरिक पडत आहे

नगर परिषद प्रशासन कराच्या नावावर मालमत्ताकर, शिक्षणकर, वृक्षाकर, स्वच्छताकर, पाणी पुरवठाकर यासह अनेक कर पालिका प्रशासनाकडून वसुल करण्यात येतात मात्र किल्ले धारूर शहरातील नागरिकांना मूलभूत सुविधाच्या नावे ठेगा मिळत आहे दहा वर्षापासून शहरातील नागरिकांना मुबलक पाणी, रस्ते, स्वच्छता, व इतर सुविधा उपलब्ध करून देण्यात पालिका प्रशासन सपशेल




अपयशि ठरली आहे मग कोणत्या अधिकाराने कर सक्तीने भरा असे आदेश मुख्य अधिकारी देतात असा प्रश्न नागरिकांना पडला आहे नागरिकांना दर्जेदार मूलभूत सुविधा पुरवणी पालिकेचे कर्तव्य आहे या सुविधांच्या बदल्यात मालमत्ता कर भरणे हेही नागरिकांचे कर्तव्यच आहे पण शहरातील नागरिकांना वारंवार असुविधांचा सामना करावा लागत आहे याला पालिकेचे कुचकामी धोरण कारणीभूत असेल तर नागरिकांन कडून मालमत्ता कराची सक्तीने वसुली का करावी असा प्रश्न सामाजिक कार्यकर्ते व शहरातील सुजाण नागरिकांना पडत आहे धारूर शहराच्या रेंगाळलेल्या पाणीपुरवठ्याचा प्रश्न सोडवण्यासाठी मुख्याधिकाऱ्यांनी नवीन योजनेचे काम सुरू केले आहे याबद्दल त्यांचे कौतुकच पण याच योजनेतून नवीन नळ कनेक्शन साठी मालमत्ता कर भरूनच नवीन नळ जोडणी साठी अर्ज करा असा आदेश काढला आहे यामुळे नागरिक संतप्त झाले आहेत दर्जेदार मूलभूत सुविधा दिल्यास शहरातील नागरिक आपण होऊन मालमत्ता कर भरतील अशी चर्चा शहरात सुरू आहे.

# महाराष्ट्रातील सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची बातमी !

## राज्यातील सर्व शाळांमध्ये 'हे' गीत गावे लागणार

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्यातील सर्व शाळांमध्ये 'जय जय महाराष्ट्र माझा' हे राज्यगीत सक्तीने वाजवले जाईल, असा स्पष्ट आदेश शालेय शिक्षण विभागाकडून देण्यात आला आहे. या निर्णयामागचा उद्देश विद्यार्थ्यांमध्ये महाराष्ट्राच्या इतिहासाबाबत अभिमान जागवणे आणि एकात्मतेची भावना दृढ करणे हा आहे. राज्य सरकारने या गीताच्या अनिवार्यतेसंदर्भात आधीही सूचना दिल्या होत्या, मात्र आता त्याची अंमलबजावणी अधिक काटेकोरपणे करण्यात येणार आहे.

मागील वर्षी शाळांमध्ये सक्तीने हे गीत वाजवले जावे, याबाबत आदेश दिले गेले होते. यंदा शालेय शिक्षणमंत्री दादाजी भुसे यांनी त्या निर्णयाची व्याप्ती वाढवत, केंद्रीय आणि आंतरराष्ट्रीय बोर्डांच्या शाळांनाही या आदेशात सामील केले आहे. राज्याच्या शिक्षण सहसंचालक (प्राथमिक) रमाकांत काठमोरे यांनी सर्व विभागीय उपसंचालकांना या आदेशाच्या अंमलबजावणीसंदर्भात जबाबदारी सोपवली आहे.



राज्यगीत गाणे बंधनकारक

या गीताची ओळख अधिक सखोल आहे. 'काळ्या छातीवरी कोरली, अभिमानाची लेणी' अशा ओळींमधून राज्यातील नागरिकांची निर्भीड वृत्ती आणि

▶▶ उर्वरित पान २ वर

# 'आपले सरकार' पोर्टलची सेवा पाच दिवस बंद

**मुंबई । प्रतिनिधी**

''आपले सरकार' पोर्टलची सेवा नियमित व तांत्रिक देखभालीसाठी १० ते १४ एप्रिल, २०२५ अशी पाच दिवस बंद राहील. या कालावधीत 'आपले सरकार' सेवा पोर्टलमार्फत दिली जाणारी कोणतीही सेवा उपलब्ध असणार नाही, याची सर्व संबंधितांनी नोंद घ्यावी, असे महाराष्ट्र माहिती तंत्रज्ञान महामंडळ मर्यादित (महाआयटी) यांनी प्रसिद्धी पत्रकान्वये कळविले आहे. या काळात कार्यालयीन कामकाजाचा फक्त एक दिवस वगळता उर्वरित सर्व दिवस सार्वजनिक सुट्टीचे आहेत. राज्यातील सर्वसामान्य नागरिक, ग्रामीण आणि शहरी भागातील 'आपले सरकार' केंद्र चालक, 'सेतू' केंद्र चालक, संबंधित ग्रामपंचायती आणि शासकीय कर्मचारी यांनी कृपया या पूर्वसूचनेची नोंद घ्यावी.

# बीडमध्ये पुन्हा चोरीची मोठी घटना, वॉचमनला बांधून

## १२ लाखांची कॉपर वायर चोरली, १४ जणांवर गुन्हा दाखल

**बीड । प्रतिनिधी**

बीड जिल्ह्यातील केज तालुक्यातील विडा येथे अवादा कंपनीच्या कॉपर वायरची चोरी झाल्याची घटना घडली आहे. सुमारे १२ लाख रुपये किंमत असलेल्या कॉपर वायरची चोरी झाली आहे. वॉचमनला बांधून ही कॉपर वायरची चोरी करण्यात आली आहे. अभिजीत



दुनघव, आकाश जाधव या दोन्ही कर्मचाऱ्यांना अज्ञातांकडून बांधून चोरी करण्यात आली आहे. याप्रकरणी १४ अज्ञाताविरोधात केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन सुरक्षा रक्षकांना बांधून १२ लाख रुपये साहित्याची चोरी

दोन सुरक्षा रक्षकांना बांधून आवादा ▶▶ उर्वरित पान २ वर

# शांताई अर्बन मध्ये कामदा एकादशी निम्मित विठूरायाची पूजा संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

अल्पावधीत लोकप्रिय ठरलेल्या शांताई अर्बन मध्ये बीड येथील ह.भ.प इंगळे महाराज, मराठवाडा पत्रक चे संपादक दत्तात्रेय नरनाळे, स्टार हेल्थ चे सेल्स मॅनेजर गणेश खासदार सर यांच्या हस्ते विठू रायाची पूजा करण्यात आली.

संपादक सर बोलताना म्हणाले की या धका धकी च्या आयुष्यात महाराष्ट्राची संस्कृती सांभाळण्याच काम शांताई अर्बन मध्ये तर्फे केले शांताई अर्बन ची प्रगती दिवसेन दिवस वाढत आहे सामाजिक आर्थिक क्षेत्रात नावाजलेल्या या संस्थेचे कार्य खूप महान आहे संस्थेचे संस्थापक डॉ. ज्ञानेश्वर शिंदे सर यांनी मान्यवरांचा शाल श्रीफळं देऊन सत्कार केला कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी संस्थेचे उपाध्यक्ष संदीप वाघमारे व सर्व संचालक मंडळ कर्मचारी आणि पिग्मी एजन्ट उपस्थित होते.

# चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह मानवी हक्काची लढाई :अँड. सिद्धार्थ शिंदे

## महामानव सार्वजनिक वाचनालय डॉ. बाबासाहेब यांना विनम्र अभिवादन व थोर इतिहासकार मा.म.देशमुख यांना भावपूर्ण आदरांजली

**बीड । प्रतिनिधी**

उच्च शिक्षण घेऊन विद्या विभूषित होऊन आपले संपूर्ण आयुष्यभर दीन दलित वंचित बहुजनांच्या व देशाच्या हिताकरता झटलेल्या डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या प्रत्येक लढा मानव विकास करता व स्वाभिमानाची लढाई होती. त्यापैकी त्या काळात नैसर्गिक संपत्ती पासून देखील दीनदलित अस्पृश्य समाजाला सार्वजनिक



मालकीच्या पाण्याला देखील स्पर्श करू देत नव्हते, त्याकरता डॉ. बाबासाहेबांनी फुले, शाहूंच्या विचाराने प्रेरित झालेल्या त्या काळातील उच्चवर्णी यांच्या बहुमोल सहकार्यांनी महाड येथील चवदार तळ्याच्या पाण्याकरता २० मार्च १९२७ रोजी सत्याग्रह केला होता. तो चवदार तळ्याच्या पाण्याचा सत्याग्रह मानवी हक्काची लढाई होती. त्या लढाईची स्मृति प्रेरणादायी आहे असे उद्गार अध्यक्षपदी लाभलेले अँड. सिद्धार्थ शिंदे यांनी काढले. महामानव सार्वजनिक वाचनालय धानोरा रोड बीड येथे महाडच्या सत्याग्रह संग्राम दिन म्हणून संपन्न करून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांना विनम्र अभिवादन केले. तसेच थोर इतिहासकार व बहुजनांच्या हिताकरता व त्यांना अंधश्रद्धा अनिष्ट रुडी परंपरा ▶▶ उर्वरित पान २ वर




CMYK

# आठवणीतील दादा

**कै. स्वरूपराव पांडुरंग वाघमारे(पाटील ) (नाळवंडीचे पाटील) प्रथम वर्षश्राद्ध दि. ०९/०४/२०२५**



नाळवंडी म्हटलंकी स्वरूपरावं पाटील (दादा) यांची का? अशी ओळख असलेले दादा, म्हणजे नाळवंडी आणि दादा ही नाळ कायम सात दशक जोडलेले,नाळवंडी

आणि पंचकुर्शीतील कोणताही वाद असो भावा भावाचा असो, गावा गावाचा असो,सामाजिक असो, आर्थिक असो,राजकीय असो,न्याय निवाडा हा पूर्वी पासून पाटील म्हणून दादाच करायचे न्याय निवाडा हा पूर्ण समाधानाने होत असल्याने शब्दाला किंमत होती,शब्दाला दरारा होता, शब्दाला मान सन्मान होता यामुळे आसपासच्या गावातील देखील लोक न्यायनिवाड्यासाठी दादाकडे येत असत दादा दोन्ही पक्षकाराचे सगळं ऐकून योग्य न्याय देत असत (दादाची ही बैठक म्हणजे छोटे न्यायालय होते ) ही परंपरा दादाने सात दशक नियमांनी आणि न्यायाने निभावली यात कधी कोणावरही अन्याय झाला नाही म्हणून जाणीवपूर्वक लोकभिमुख न्यायालय म्हणून दादाची ओळख पंचक्रोशीत कायम राहीली. नाळवंडी आणि पंचकुर्शीतील कोणताही कार्यक्रम राजकीय असो सामाजिक असो तो दादाच्या संमतीने आणि मार्गदर्शनाने अगदी मोठ्या उत्साहात पार पडत असे यात कोणतीही जात, धर्म, पंत कधीही आडवा आला नाही. दादांचा शांत, संयमी, प्रेमळ,सतत आनंदी आणि लोकांना धरून काम करण्याचा स्वभाव असल्यामुळे सर्व जाती धर्मातील लोक नेहमी प्रसन्न राहत असे व पंचक्रोशीतील लोक एकूणच छोटया मोट्या कार्यक्रमाला दादांना मोठ्या आदराने बोलवून मान देऊन सन्मानित करत असत.स्व. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर(माजी खासदार )आणि मा. जयदत्त आण्णा क्षीरसागर( माजी मंत्री ) यांच्याशी आयुष्यभर एकनिष्ठ राहून त्यांनी काम केले आणि येणाऱ्या पिढीला एकनिष्ठतेचा वसा आणि वारसा दिला. यांचबरोबर गजानन सहकारी साखर कारखान्याचे डायरेक्टर पद आणि संगमेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ही पद मोठ्या सन्मानानेआणि आदराने भूषविली. विरोधकाला देखील प्रेमाने आणि प्रेमाला देखील प्रेमाने जिंकावे ही भूमिका दादांनी संपूर्ण आयुष्यभर पाळली. नाळवंडीच्या एकूणच जडण – घडनित आणि काय पालट करण्यात दादांचा मोठा वाटा आहे हे निश्चित.दादांची एकूण सर्व क्षेत्रांमध्ये काम करण्याच्या या पद्धती मुळे त्यांचा रुबाब,धबधबा, शब्द आणि समाजाला धरून चालण्याची प्रवृत्ती ही कायम उल्लेखनीय ठरली.

नाळवंडी आणि पंचकुर्शीतील कित्येक जणांना नोकरीला लावण्याचे काम देखील दादांनी केले. धार्मिक अद्यात्मिक व सामाजिक क्षेत्रात देखील दादाचे काम उल्लेखनिय आहे.

आचार, विचार आणि संस्काराची रुजवणूक त्यांनी कुटुंबा बरोबरच समाजात देखील केली. हे सर्व कार्य करत असताना ते आयुष्य भर कधीच कोणत्याच व्यसनाच्या आहारी गेले नाहीत. आयुष्यतील चढ– उतार आणि चांगल्या वाईट गोष्टी ते मला मनमोकळे मनाने निसंकोच सांगत असत.

आयुष्यभर कधीच कोणाला त्रास दिला नाही कधीच कोणाचे वाईट व्हावे ही भावना ठेवली नाही.नेहमी सर्वात मिळून मिसळून आणि सतत आनंदी राहिले. एवढेच नाहीतर शेवटी सर्वांना बोलत चालत कोणालाही न दु:खवता हसत हसत येहलोकीची निरोप घेतला आणि अनंतात विलीन झाले.. यालाच म्हणतात कर्मफळ कोणत्याही दवाखान्यात न ऍडमिठ होता ज्या ठिकाणी आयुष्यभर कार्य केले त्याच ठिकाणी शेवटचा श्वास घेतला. माणूस आयुष्यभर केलेल्या कर्माने कायम मना मनात राहतो. हे मोठे दुःख पचवण्याचे सामर्थे आणि हा वसा – वारसा पुढे चालवण्याचे सामर्थे परमेश्वर त्यांच्या सर्व वारसाना, नातेवाईकाना देवो ही प्रार्थना.

गुरूने दिला ज्ञान रुपी वसा! आम्ही चालवू हा पुढे वारसा!! प्रथम वर्षश्राद्ध भावपूर्ण आदरांजली दादा

– मा. वाघमारे रामेश्वर हरिश्चंद्र, चेअरमन – स्वप्नपूर्ती अर्बन परिवार



# डॉ. बाबासाहेब आंबेडकर एक प्रभावशाली अर्थतज्ञ






डॉ. बाबासाहेब आंबेडकर, भारतीय संविधानाचे शिल्पकार, एक अत्यंत महत्त्वाचे अर्थतज्ञ होते आणि त्यांच्या विचारांनी भारताच्या अर्थव्यवस्थेवर खोल प्रभाव केला आहे. त्यांच्या कामामध्ये प्रॉब्लेम ऑफ रुपी या ग्रंथाचे विशेष महत्त्व आहे. या ग्रंथामध्ये त्यांनी भारतीय चलन व्यवस्थेच्या विविध पैलूंवर सखोल विचार केले, जो भारतीय अर्थव्यवस्थेच्या विकासात महत्त्वपूर्ण ठरला.

प्रॉब्लेम ऑफ रुपी ग्रंथातील महत्त्वाचे मुद्दे:

१ चलनाचे महत्व : आंबेडकर यांनी रुपयाविषयी चर्चा केली आहे, ज्या अंतर्गत त्यांनी भारतीय रुपयाच्या स्थिरतेचा संदर्भ दिला आहे. त्यांच्या विचारानुसार, चलनाची स्थिरता अर्थव्यवस्थेच्या विकासासाठी अत्यंत आवश्यक आहे.

२ बँकिंग प्रणाली : आंबेडकर यांनी बँकिंग प्रणालीच्या गरजेसाठी जोरदार वकिली करून, केंद्रीय बँक (या संदर्भात रिझर्व बँक ऑफ इंडिया) स्थापन करण्याची आवश्यकता व्यक्त केली. त्यांनी म्हणजे बँकांच्या निगडित आर्थिक नियंत्रणामुळे चलन व्यवस्थापनात स्थिरता येते, हे स्पष्ट केले.

३ आर्थिक धोरणे : त्यांनी अर्थव्यवस्था सुधारण्यासाठी आवश्यक असलेल्या आर्थिक धोरणांचा अभ्यास केला. त्यांचा विश्वास होता की एक स्वतंत्र आणि शक्तिशाली केंद्रीय बँक अर्थव्यवस्थेच्या स्थिरतेसाठी आवश्यक आहे.

४. रिझर्व बँक ऑफ इंडिया ची स्थापना:

स्थापन: १ एप्रिल १९३५ रोजी रिझर्व बँक ऑफ इंडिया स्थापन करण्यात आली.– उद्दीष्ट: या बँकेचे प्राथमिक उद्दिष्ट भारतीय रुपयाचे नियंत्रण आणि चालना देणे होते, ज्यामुळे देशात आर्थिक स्थिरता निर्माण होईल. महत्त्व: रिझर्व बँकाने चलनाचे व्यवस्थापन, व्याज दर धोरण, आणि अर्थव्यवस्थेचा सर्वांगीण विकास यासाठी महत्त्वाची भूमिका निभावली.

निष्कर्ष:

डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे प्रॉब्लेम ऑफ रुपी यासारखे कार्य आर्थिक आधारस्तंभ प्रदान करणारे ठरले. त्यांच्या विचारांना आधारभूत होऊन रिझर्व बँक ऑफ इंडिया ने भारतीय अर्थव्यवस्थेच्या व्यवस्थापनात क्रांतिकारी बदल केले. आंबेडकर यांचे विचार, विशेषत: चलन व्यवस्थापन संदर्भात, आजही महत्त्वाचे मानले जातात, ज्यामुळे त्यांच्या योगदानाची महत्ता अधोरेखीत होते. साठी

– बालाजी जगतकर, बीड.

पान १/४ वरून पुढे...

## महाराष्ट्रातील सर्व...

अभिमान व्यक्त केला जातो. हे गीत प्रसिद्ध गीतकार राजा बढे यांनी लिहिलं असून, श्रीनिवास खळे यांचे संगीत आणि शाहीर साबळेंचा आवाज यामुळे ते आजही लोकांच्या मनात घर करून आहे.

शालेय वेळापत्रकानुसार, दररोज सत्र सुरू होण्यापूर्वी राष्ट्रगीत, परिपाठ, प्रार्थना, प्रतिज्ञा यांसोबत राज्यगीतही गायले जाणे बंधनकारक आहे. यापूर्वी सर्व शाळांना या संदर्भात वेळोवेळी सूचित करण्यात आले होते, मात्र अनेक शाळांनी या आदेशाकडे दुर्लक्ष केल्याचे शिक्षण विभागाच्या निरीक्षणात आले आहे. त्यामुळे आता जिल्हानिहाय अहवाल मागवण्यात येणार आहे.

शिक्षण विभाग ठेवणार नजर–

राज्य शिक्षण विभागाने स्पष्ट आदेश दिले आहेत की, सर्व माध्यमांच्या, सर्व प्रकारच्या व्यवस्थापनांतील शाळांमध्ये राज्यगीत गायलेच पाहिजे. यावर विभागीय उपसंचालक कटाक्ष ठेवणार असून, प्रत्येक शाळेने हे गीत वाजवले जाते की नाही, याचा तातडीने अहवाल सादर करणे आवश्यक आहे.

या निर्णयामुळे आता राज्यातील सर्व शाळांमध्ये सकाळच्या सत्राची सुरुवात 'जय जय महाराष्ट्र माझा' या गर्जना करणाऱ्या गीताने होणार आहे. विद्यार्थ्यांमध्ये राज्याविषयी अभिमानाची भावना वाढवण्यासाठी हे पाऊल महत्त्वाचं ठरणार आहे.

## बीडमध्ये पुन्हा ...

पवन चक्कीचे १२ लाख रुपये साहित्याची चोरी केली आहे. याप्रकरणी १४ अज्ञात चोरट्यां विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला आहे. पवनचक्कीच्या सुरक्षा रक्षकाला बांधून पवन चक्कीचे सुमारे १२ लाख रु. किंमतीचे साहित्य अज्ञात चोरट्यांनी चोरून नेल्याची खळबळजनक घटना केज तालुक्यात घडली आहे. आवादा एनर्जी या पवन ऊर्जा कंपनीचे पवनचक्की उभारणीचे काम सुरु आहे. दिनांक ८ एप्रिल रोजी पहाटे सुमारे २.३० वाजण्याच्या सुमारास ही चोरीची घटना झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे.

विडा येथे पवन चक्की उभारणीच्या कामावर काम करीत असलेले सुरक्षा रक्षक झोपलेले असताना अज्ञात चोरट्यांनी सुरक्षा रक्षक अभिजित दुनघव व आकाश जाधव यांना त्यांच्या चादर फाडून त्यानेच त्यांचे हातपाय बांधले. पवन चक्कीचे केबल व इत्तर साहित्य चोरुन नेले आहे. याबाबतची माहिती सुरक्षारक्षक अभिजित दुनघव व आकाश जाधव यांनी साहित्य चोरीची माहिती आवादा कंपनीच्या अधिकाऱ्यांना दिली. याप्रकरणी आकाश जाधव याच्या तक्रारी नुसार १४ अज्ञात चोरट्या विरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या प्रकरणाचा पुढील तपास केज पोलीस करत आहेत.

पान १/४ वरून पुढे...

## चवदार तळ्याच्या...

पासून दूर राहण्याकरता प्रखर लेखन करणारे थोर वक्ते प्राध्यापक मा.म. देशमुख यांच्या दुःखद निधनादिनी त्यांच्या प्रतिमेस पुष्प, पुष्पमाला अर्पण करून भावपूर्ण आदरांजली अर्पण करण्यात आली. कार्यक्रमाकरिता वंचित बहुजन आघाडीचे गेवराई तालुका महासचिव किशोर भोले, सैनिक दलाच्या वंदना वाघमारे प्रमुख पाहुण्या म्हणून लाभल्या होत्या. विचार मंचावर महामानव अभिवादन ग्रुपचे अध्यक्ष जी.एम. भोले प्रा. अशोक गायकवाड, सेवानिवृत्त जिल्हा प्रबंधक यू.एस. वाघमारे, यांची प्रमुख उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक वाचाल तर वाचालचे अध्यक्ष डी.जी. वानखेडे यांनी तर सूत्रसंचालन डी.एम. राऊत यांनी केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष पुढे म्हणाले की सामाजिक परिवर्तनाच्या चळवळीच्या यशाकरता एका विशिष्ट समुदायाचा लढा न उभारतात सर्व समावेशक समाज हिताकरता सर्वांनी सहभाग नोंदवून जसा चवदार तळ्याच्या सत्याग्रहांमध्ये डॉ. बाबासाहेबांच्या मानवी हक्क च्या लढाई करता सुरभा नाना टिपणीस, गंगाधर सहस्त्रबुद्धे, अनंत चित्रे, शेख बांधव ज्यांनी सत्याग्रहाच्या मंडपाकरता जमीन दिली होती. असे शेख बांधव यांनी बहुमोल सहकार्य करून तत्कालीन हक्क व कर्तव्याची पूर्णपणे जाणीव ठेवून लढा दिला तर यश नक्की मिळते हे महाडच्या चवदार तळ्याच्या सत्याग्रह दीपस्तंभ प्रमाणे प्रेरणादायी आहे त्या काळातील अनेक उदाहरणे देऊन स्पष्ट केले. याप्रसंगी प्रमुख पाहुणे किशोर भोले वंदनाताई वाघमारे, सुजाता वासनिक यांनी महाडच्या सत्याग्रहाबद्दल व थोडी इतिहासकार मा.म. देशमुख यांच्या जीवन कार्याबद्दल माहिती दिली. कार्यक्रमाचे कार्यक्रमा अर्जुन जवंजाळ, एस.एस. सोनवणे,सुधाकर विद्याधर, विद्याधर नाणी, बि.डी. तांगडे, व महामानव अभिवादन ग्रुपचे बहुसंख्य सदस्य उपस्थित होते. कार्यक्रमाचे आभार के.एस.वाघमारे यांनी व्यक्त करून सरणातयेने कार्यक्रमाची सांगता झाली.

## आज बालाजी मंदिर....

अमर नाईकवाडे यांनी केले आहे. जे श्रावणबाळ संजय गांधी योजनेचे अपंग,वयोवृद्ध लाभार्थी तहसील मध्ये जाऊ शकत नाहीत, ज्यांच्या पगार झालेल्या नाहीत. म्हणजे ज्यांची डीबीटी करणे बाकी आहे, तसेच ज्यांचे अंगठे मशीनवर उमटत नाहीत अशांसाठी पेठ विभागातील मध्यवर्ती ठिकाण बालाजी मंदिर, जुना मोंढा रोड पेठ, बीड येथे दि. ०९/०४/२०२५ वार बुधवार रोजी वेळ सकाळी १० ते सायंकाळी ४ या वेळेत शिबिराचे आयोजन केले आहे, तरी सर्व लाभार्थ्यांनी याचा लाभ घ्यावा ही विनंती मुख्यमंत्री लाडकी बहीण योजना समिती विधानसभा अध्यक्ष व नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी केली आहे.

पान १/४ वरून पुढे...

## आईच्या वाढदिवसानिमित्त...

पाण्याची व्यवस्था व्हावी म्हणून धारूर शहरातील सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे नितीन शुक्ला यांनी आपल्या मातोश्री शांतादेवी नरेंद्र प्रसाद शुक्ला यांच्या वाढदिवसानिमित्त शहरातील वर्दळीचे ठिकाण असलेले बाजारतळ या ठिकाणी पानपोई उभारली असून या पानपोळीच्या माध्यमातून या भागात येणार्या नागरिकांना मोफत जारचे पाणी पिण्यासाठी मिळणार आहे नितीन शुक्ला यांच्या स्तुत्य उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होता आहे.

## कोळेश्वरच्या विद्यार्थ्यांनी...

वापर केला जात आहे.कोळगाव येथील नुतन कोळेश्वर विद्यालयातील विद्यार्थी नेहमीच नवनवीन नाविन्यपूर्ण उपक्रम राबवितात. या शाळेतील विद्यार्थ्यांनी कला शिक्षक किशोर निकम सर यांच्या मार्गदर्शनाखाली उन्हाची तीव्रता वाढताच मागील महिण्यात तहानलेल्या पक्षांसाठी शाळेच्या आवारात असलेल्या झाडावर पाण्याच्या कुंड्या बांधल्या आहेत. यामुळे विविध पक्षांचा शाळेच्या आवारात सतत किलबिलाट पहायला मिळतो. तसेच नवीन वृक्ष भर उन्हाळ्यात देखील संगोपन झाले पाहिजे यासाठी टाकाऊ बाटल्यापासून झाडांना सिंचणाप्रमाणे पाणी देण्याची सोय करण्यात आली आहे, यामुळे शाळेच्या परिसरातील झाडे भर उन्हाळ्यात देखील हिरवीगार झाली आहेत. या उपक्रमामुळे झाडे लावा, झाडे जगवा यासह पक्षी संवर्धनाची एकप्रकारे विद्यार्थ्यांमध्ये आवड निर्माण झाली आहे. अशाचप्रकारे शाळेतील राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी कला शिक्षक किशोर निकम यांच्या मार्गदर्शनाखाली शालेय पोषण आहारसाठी लागणारा भाजीपाला सेंद्रिय नैसर्गिक पद्धतीचा वापर करून शाळेतच पिकवला जातो. या विद्यार्थ्यांनी शाळेतील परसबागेत सध्या टमाटे, मिरची, कोथिंबीर आदी भाजीपाला चांगलाच बहरला आहे. परसबागेत पिकवलेला हा भाजीपाला हा शाळेच्या मध्यान्ह आहारामध्ये वापरला जात आहे. त्यामुळे या सेंद्रिय पिकवलेल्या भाजीपाल्यामुळे विद्यार्थ्यांचे आरोग्य सदृढ राहण्यास मदत होईल, तसेच सदरील उपक्रमामुळे विद्यार्थ्यांच्या मनामध्ये शेतीविषयी आवड निर्माण होत असून या अनोख्या उपक्रमाचे शाळेचे मुख्याध्यापक आर.व्ही.बागलाने व सर्व शिक्षक वृंदानी कौतूक केले.

## बीड जिल्ह्याचे नाव...

जगताप, राजू महूवाले, सुरेश तात्या शेटे,ओम तात्या खवतड, माजी नगरसेवक बाबुराव परळकर,उप तालुका प्रमुख शिवाजी तीपाले यांच्या प्रमुख उपस्थितीमध्ये करण्यात आला यावेळी शिवसेना व धांडे परिवारातील सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पान १/४ वरून पुढे...

## अस्सल मराठवाडी...

जातात या यजमानांच्या हस्ते महारुद्राभिषेकही केला जातो सायंकाळी सात वाजता नाट्यप्रयोगाची सुरुवात होते प्रारंभी रोकडेश्वर पंचपदी होऊन मग नाट्यप्रयोगाला सुरुवात होत असते या पंचपदीमध्ये विदूषक सरस्वती गणपती आणि सूत्रधार आणि पंचपदी गायक यांचा समावेश असतो एक तासाच्या पंचपदीनंतर कलाकारांनी बसवलेले नाटक रसिक प्रेक्षकांसमोर सादर केले जाते, नाट्यप्रयोग संपल्यानंतर उत्तर रात्री श्री रोकडेश्वराची आरती करून रोकडेश्वर प्रसादिक नाट्य मंडळाच्या कलाकारांच्या वतीने दुसऱ्या दिवशी श्रमपरिहार केला जातो असा तीन दिवशीय उत्सव यावर्षी देखील होणार आहे यावर्षी गंगाराम गवाणकर लिखित आणि मच्छिंद्र कांबळी यांच्या कोकणी भाषेत सादर झालेल्या वस्त्रहरण या नाटकाचा प्रयोग अस्सल मराठवाडी भाषेत सादर होणार आहे हा नाट्यप्रयोग पाहण्यासाठी रसिक प्रेक्षकांनी आणि ग्रामस्थांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

## आदित्य फार्मसिच्या...

संस्थेच्या संचालिका डॉ. आदिती सारडा यांच्या मार्गदर्शनाखाली आदित्य फार्मसिच्या ७० विद्यार्थ्यांनी बीड शहरापासून जवळ असलेल्या पाली येथील आनंदग्रामला भेट दिली. यावेळी कार्यक्रमाला प्रमुख उपस्थिती म्हणून आदित्य फार्मसिचे प्राचार्य डॉ. कुमार सुरवसे, इन्फंट इंडिया ट्रस्ट आनंदग्राम पालीच्या वैष्णवी उपस्थित होत्या. यावेळी व्यासपीठावर अनुजा सानप, प्रतीक्षा जाधव, प्रियंका नागरगोजे यांची उपस्थिती होती. डॉ. कुमार सुरवसे यांनी एच.आय.व्ही. ग्रस्त विद्यार्थ्यांचे जीवन व मुलांना तोंड द्यावी लागणारे आव्हाने या आजाराविषयी गैरसमज बाळगू नये. कधीही बरा न होणारा, अनेकांच्या मृत्यूचं कारण ठरलेला आजार म्हटला की समोर येणाऱ्या नावांच्या यादीत कखत एड्सचं नाव सुद्धा असतंच. कोणत्याही अन्य आजाराप्रमाणेच प्रतिकारशक्ती कमी करून शरीर क्षीण करणारी अशी ही स्थिती असली तरी त्याला जोडून येणाऱ्या सामाजिक दृष्टिकोनामुळे याबाबत अनेकदा मौन बाळगले जाते. परिणामी या आजाराविषयी गैरसमजुती वाढण्याचे प्रमाण सुद्धा जास्त आहे. गैरसमजुती न वाढवता बाधित मुलांनाही समाजात समान हक्काने जगता आले पाहिजे त्यासाठी आपण सर्वांनी प्रयत्न करणे काळाची गरजेचे आहे असे आदित्य फार्मसीचे प्राचार्य, डॉ. कुमार सुरवसे यांनी आपले मनोगत व्यक्त केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. मोराळे यांनी केले. यावेळी त्यांनी मुलांना एचआयव्ही आजारासंबंधी माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. ज्ञानेश्वर वाघमोडे यांनी तर आभार प्रा. विठ्ठल मुळे यांनी मानले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रा. मोराळे,चेतन शिंदे प्रयोगशाळा तंत्रज्ञ आदित्य फार्मसि बीड यांनी परिश्रम घेतले.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed (Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड – ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक – दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

### अद्ययावत राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते उद्घाटन

# नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे आपत्कालीन कार्य केंद्र अधिक सक्षम : मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

**मुंबई । प्रतिनिधी**

राज्य आपत्कालीन कार्य केंद्रात आधुनिक तंत्रज्ञान, वेगवान संवादव्यवस्था आणि कृत्रिम बुद्धिमत्तेच्या (ख) वापरामुळे आपत्ती व्यवस्थापनाला तंत्रज्ञानाचे बळ मिळाले आहे. या नव्या अद्ययावत आपत्कालीन कार्य केंद्रामुळे आपत्तीच्या वेळी जलद, अचूक आणि समन्वित प्रतिसाद देणे अधिक प्रभावी होणार आहे. राज्य आपत्कालीन कार्य केंद्रातील नवीन तंत्रज्ञानाच्या वापरामुळे केवळ आपत्तीच्या वेळी नाही, तर आपत्तीपूर्व सजगतेपासून पुनर्वसनापर्यंतची परिस्थिती व आपत्ती



व्यवस्थापन अधिक सक्षमपणे हाताळता येईल, असे प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्य आपत्कालीन कार्य केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी केले. मंत्रालयात नवीन तंत्रज्ञानाने अद्ययावत केलेल्या राज्य आपत्कालीन कार्य केंद्राचे उद्घाटन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते व उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री अजित पवार, आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन, पर्यटन, खनिकर्म माजी सैनिक कल्याण मंत्री शंभूराज देसाई, शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे, इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास अपारंपरिक ऊर्जामंत्री अतुल सावे, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, मुख्य सचिव सुजाता सौनिक, 'मित्रा'चे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रवीण परदेशी,

मदत व पुनर्वसन विभागाच्या अतिरिक्त मुख्य सचिव सोनिया सेठी,आपत्ती व्यवस्थापन संचालक सतीशकुमार खडके यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. मुख्यमंत्री श्री. फडवणीस म्हणाले, हवामानातील बदलामुळे आपत्तीचे स्वरूप, तीव्रता आणि वारंवारता बदलत आहे.

त्यामुळे 'मिटिगेशन' आणि घटनांनंतर तात्काळ प्रतिसाद यावर भर देणे आवश्यक आहे. आपत्ती व्यवस्थापनासाठी एक सशक्त 'कमांड आणि कम्युनिकेशन सिस्टीम' असणे महत्त्वाचे असून, निर्णय लवकर घेता यावेत, जलद प्रतिसाद देता यावा, यासाठी हे केंद्र उपयुक्त ठरेल, असा विश्वास मुख्यमंत्री श्री.फडणवीस यांनी यावेळी व्यक्त केला. राज्यातील प्रत्येक जिल्ह्यातही अशा प्रकारची आधुनिक व्यवस्था उभारण्याचे काम सुरू असल्याचे मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी यावेळी सांगितले. तसेच नागपूर येथे प्रस्तावित आपत्ती व्यवस्थापन संस्थेच्या स्थापनेच्या निर्णयाचेही मुख्यमंत्री महोदयांनी स्वागत केले. आपत्ती येऊ नये, हीच आपली इच्छा आहे; पण आलीच, तर तिच्याशी सक्षमपणे लढण्यासाठी आपली व्यवस्था पूर्णपणे सज्ज असल्याचे सांगून मुख्यमंत्री श्री. फडणवीस यांनी या आपत्कालीन केंद्राच्या उभारणीत योगदान दिलेल्या सर्व अधिकाऱ्यांचे व कर्मचाऱ्यांचे अभिनंदन केले.

## महत्वाचे

### तिरुपती हॉस्पीटलमध्ये हाडांसाठी भव्य मोफत शिबिर

**बीड । प्रतिनिधी**

येथील डॉ.बालाजी नवले यांच्या तिरुपती सुपर स्पेशालिटी हॉस्पीटल अँड स्पाईन केअर सेंटरमध्ये श्रीराम नवमी निमित्त तसेच भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर जयंती हाडाची ठिसुळता (ऑस्टिओपोरोसीस) मोफत तपासणी शिबीर येत्या शनिवार दि १२ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ५ वाजेपर्यंत आयोजीत केले आहे त्याचा लाभ घेण्याचे आवाहन हॉस्पीटलच्या वतीने करण्यात आले आहे. पुढे दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, हाडाची ठिसुळता (बीएमडी) ही वयाच्या चाळीशीनंतर स्त्री व पुरुष या दोघांमध्ये आढळते. हाडाची ठिसुळता म्हणजे हाडांतील कॅल्शिअम कमी होवून हाडे ठिसुळ व कमकुवत बनतात आणि यामुळे पुढे वरचेवर फ्रॅक्चर व सांधेदुखीचे वयाबरोबर वाढलेले प्रमाण वाढते. स्त्रीयांना रजोनिवृत्तीनंतर वाढत्या वयाबरोबर हाडातील कॅल्शिअमचे प्रमाण ३० ते ४० टक्केपर्यंत कमी झालेले आढळते. हाडाची ठिसुळता याच्याकरिता उपचार पद्धती उपलब्ध आहेत. बाहेर इतरत्र ठिकाणी या तपासणीसाठी १५०० ते २००० रुपये खर्च येणारी ही तपासणी मोफत असून या सुवर्णसंधीचा लाभ घेवून आपल्याला भविष्यात होणार्या हाडांच्या आजारावर मात करण्यासाठी उपस्थित राहावे असे आवाहन आयोजक तिरुपती हॉस्पीटलकडून करण्यात आले आहे. सदरील शिबिर तिरुपती हॉस्पीटल, नगर नाका, लाईफ लाईन हॉस्पीटलसमोर, बीड येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ७७७०००३२२९/ ८६६८२१२३३१ वर संपर्क करावा.

### गेवराईत जिल्हा वाहतुक शाखेची नियम मोडणाऱ्या वाहनधारकांवर कारवाई



**बीड । प्रतिनिधी**

जिल्हा पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनखाली आज जिल्हा वाहतुक शाखेने गेवराई येथे नियम मोडणार्या वाहनधारकांवर कारवाई केली यावेळी ९३ केसेस आणि ६५ हजार रुपयांचा दंड वाहनधारकांना ठोठावला तसेच रोख ८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.याबाबत माहिती अशी की, बीड जिल्ह्यात पोलीस अधिक्षक नवनीत सर यांच्या मार्गदर्शनाखाली सध्या गुन्हेगारीला आळा घालण्यासाठी सातत्याने प्रयत्न सुरु आहेत तसेच सरकारी नियमांचे पालन करण्यासाठी देखील नियम मोडणार्या वाहनधारकांवर जरब बसावा या करिता कार्यवाही सुरु आहे आज जिल्हा वाहतुक शाखेने मोटार वाहन कायद्या अंतर्गत गेवराई येथील शिवाजी चौक, बस स्टॅन्ड परिसर येथे जिल्हा वाहतुक शाखा आणि गेवराई वाहतुक शाखा ही जिल्हा वाहतुक शाखेचे प्रभारी सुभाष यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक विजय,गेवराई पोस्टचे पोलीस निरीक्षक प्रविण, पोलीस हवालदार शांतीलाल, दत्ता पोलीस आजिनाथ, पोलीस हवालदार पांडुरंग चालक पोलीस हवालदार राम पोलीस हवालदार नारायण गेवराई पोस्टचे पोलीस हवालदार विजय, किरण यांनी दुपारी ११ ते १ च्या दरम्यान गेवराईत विविध कलमांतर्गत लायसन्स नसणे, विमा नसणे, काळी काच, नो पार्किंग, ट्रिपलसीट या सदराखाली एकुण ९३ केसेस आणि ६५ हजार रुपयांचा दंड वाहनधारकांना ठोठावला तसेच रोख ८ हजार रुपये दंड वसूल करण्यात आला आहे.

### डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत - डॉ.सुदर्शन अवस्थी

**चौसाळा । प्रतिनिधी**

महामानव डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी आपल्या जीवनात गरीब,शोषीत, वंचित लोकांसाठी भरपूर काम केले. बहुजन समाजातील लोकांना समान न्याय देण्यासाठी त्यांनी अविरत प्रयत्न केले. त्यांचे जीवन व लेखन विद्यार्थ्यांना प्रेरणा देणारे आहे. त्याचे विचार विद्यार्थ्यांनी आत्मसात करावेत असे प्रतिपादन प्रा.डॉ. सुदर्शन अवस्थी यांनी व्यक्त केले. कला व विज्ञान महविद्यालय चौसाळा येथे राष्ट्रीय सेवा योजने तर्फे डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंती निमित्त प्रश्नमंजुषा व परिसंवादाचे आयोजन करण्यात आले होते.

## मराठी पत्रकार परिषद हीच आपली ओळख: एस. एम. देशमुख

### बीडमध्ये जिल्हा पदाधिकाऱ्यांचा सत्कार संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

ऐंशी वर्षाचा इतिहास असलेली मराठी पत्रकार परिषद हीच आपली ओळख असून या परिषदेला मोठा इतिहास आहे. पत्रकारांच्या प्रश्नांबरोबरच समाजाच्या प्रश्नाकडेही या परिषदेने कायम लक्ष दिलेले आहे. यापुढेही पत्रकारांचे प्रश्न सोडवण्याबरोबरच सामाजिक प्रश्नावरही मराठी पत्रकार परिषद आंदोलन करेल अशी ग्वाही मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त एस. एम. देशमुख यांनी बीड येथील शासकीय विश्रामगृहावर बीड जिल्हा नवनिर्वाचित पदाधिकाऱ्यांच्या सत्कार प्रसंगी बोलताना दिली.

यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून अप्रतिम मीडियाचे प्रमुख तथा दैनिक सामनाचे माजी संभाजीनगर आवृत्तीचे संपादक अनिल फळे, दैनिक सुराज्यचे संपादक सर्वोत्तम गावरस्कर



,डिजिटल मीडियाचे राज्य अध्यक्ष अनिल वाघमारे यांची प्रमुख उपस्थित होती.

यावेळी जिल्हाध्यक्ष विशाल साळुंके, जिल्हा कार्याध्यक्ष गजानन मुडेगावकर, जिल्हा सरचिटणीस सुभाष सुतार, विभागीय सचिव रवी उबाळे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी पुढे बोलताना एस.एम. देशमुख म्हणाले की पत्रकारांचे अनेक प्रश्न आहेत. ते सोडवण्याबरोबरच जिल्ह्याची प्रतिमा सुधारण्यासाठी आपण सर्वांनी मिळून प्रयत्न केले पाहिजेत. बीड मधील वाईट गोष्टी शिवाय बीडमध्ये खूप चांगल्या गोष्टी आहेत. हे ही पत्रकारांनी पुणे, मुंबईच्या पत्रकारांच्या निदर्शनास आणून देणे गरजेचे आहे. या जिल्ह्यात अनेक खेळाडू राष्ट्र पातळीवर गाजलेले आहेत. अनेक तरुण तरुणी देश पातळीवर कामगिरी करतात. मात्र त्यांची चर्चा होताना दिसत नाही. अशी खंतही त्यांनी बोलून दाखवली.

## मानूर येथील खून कलम ३०२ प्रकरणातील आरोपीची बीड सत्र न्यायालयातून निर्दोष मुक्तता

**शिरूर का.। प्रतिनिधी**

येथील गोकुळ प्रल्हाद महारनोर यांचे विरोधात त्यांच्या पत्नीच्या मृत्यू संदर्भाने दिनांक २८-०५-२०२३ रोजी पो.स्टे. तालुका शिरूर कासार, जि. बीड येथे गुन्हा क्रमांक ९१/२०२३ नोंद झालेला होता. तसेच दिनांक २७ मार्च २०२५ रोजी सरकारपक्ष व आरोपीच्या वकिलामार्फत या सत्र केसमधील अंतीम युक्तिवाद न्यायालयासमक्ष करण्यात आलेला होता. परंतु सत्र न्यायालयात चाललेल्या या केसमधील सरकारपक्षाच्या साक्षीपुराव्यामधून आरोपी विरोधात खुनाचा गुन्हा सिद्ध न झाल्याचे दिनांक ०४ एप्रिल २०२५ रोजी मा. प्रमुख जिल्हा सत्र



न्यायालयाने या प्रकरणांत अंतिम न्यायनिर्णय घोषित करीत या सत्र केसमधून आरोपी गोकुळ प्रल्हाद महारनोर यांची निर्दोष मुक्तता केली. या पूर्ण सत्र केसमध्ये आरोपीसाठी ॲड. कपिलकुमार विष्णुपंत बेदरे यांनी न्यायालयात अत्यंत प्रभावीपणाने काम पाहिले व विशेष बाब म्हणजे त्यांचा साक्षीपुराव्यादरम्यान आरोपीसाठी घेतलेला बचाव व अंतिम युक्तिवाद केसमध्ये अत्यंत महत्वाचा ठरला. या केस दरम्यान ॲड. कपिलकुमार विष्णुपंत बेदरे यांना ॲड. अरविंद बन्सी काळकुटे, ॲड. सिद्धार्थ मधुकरराव वारे, ॲ. राजेश बागलाने यांनी सहकार्य केले.

# तथागत बुद्धांच्या मूल्यांचे अविष्करण

## जयभिम महोत्सव: मडवॉक नाटकाने जिंकली रसिकांची मने

**बीड । प्रतिनिधी**

समुदायाच्या सृजनशील आणि धार्मिक विकासात बुद्धांच्या मूल्यांचे अध्ययन, अविष्करण आणि शाश्वत रुजवणूक, या विषयावर तीन विद्यार्थी एचडी करण्यासाठी गुफांमध्ये येतात, त्या गुफांमध्ये आल्यानंतर बेंजामिन नावाचा गाईड त्यांना भेटतो त्यांना तो बुद्धाचे तत्त्वज्ञाने टर्मिनोलॉजीमध्ये न सांगता तर अनुभवातून सांगतो. असा विषय मडवॉक नाटकात दाखविण्यात आला असून कबीर जाधव यांच्या सरस अभिनयाला रसिकांची दाद मिळाली.



डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंती निमित्ताने सामाजिक न्याय भवन येथे ४ ते १४ एप्रिल रोजी जयभिम महोत्सव आयोजित करण्यात आला आहे. त्या अनुषंगाने सोमवार (दि.७) एप्रिल रोजी मडवॉक आणि रुपेश निकाळजे यांचा क्रांतीचा साक्षीदार या नाटकांचा प्रयोग झाला.कार्यक्रमाचे अध्यक्ष म्हणून प्रा.राहुल सोनवणे, प्रमुख पाहुणे संजय पाटील देवळाणकर, एस.टी. गायकवाड आदी उपस्थित होते. मडवॉक नाटकातुन बुद्धांचे तत्वज्ञान अतिशय सोप्या भाषेत रंगमंचावर सादर करण्यात आले.

### यांनी साकारल्या भूमिका...

**श्रीपाद देशपांडे लिखित मडवॉक नाटकाचे दिग्दर्शन कबीर जाधव यांनी केलं असून अभिनयही साकारला आहे.त्याचबरोबर नेपथ्य अमित गाडे, शरद भांगरे, संगीत आकांक्षा डंबाळे, प्रकाश योजना अमन तांगडे, रंगभूषा लक्ष्मीकांत दोडके, रंगमंच व्यवस्था शुभम चव्हाण, सागर धन्वे, हर्षवर्धन जावळे, कलाकार श्रद्धा दातखीळ, शुभम चव्हाण, अभिषेक इनकर, शरद भांगरे यांनी भूमिका साकारल्या आहेत.**

त्याचबरोबर बुद्धांच्या लेण्यांचे व त्यांच्या मुर्त्यांचे खंडन व चोरी यावरही प्रकाश टाकण्यात आला आहे. बुद्धाला केवळ वचनापुरते न ठेवता, आचरणात आणावे हा संदेश मडवॉक नाटकातून देण्यात आला. मडवॉक नाटकाच्या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ॲड. नितीन वडमारे यांनी केले.आभार प्रा.अशोक गायकवाड यांनी मानले.जयभीम महोत्सवातील उर्वरित कार्यक्रमांना जनतेने उपस्थित रहावे. असे आवाहन डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती यांनी केले आहे.


## जाहीर प्रगटन

**मा. श्री. ए. एम. फडतरे, ४ थे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांच्या न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्रमांक ५८५/२०२५**

अर्जदार - १) उज्वला भ्र. साधु कदम, वय-४९ वर्षे, धंदा-शेती,रा. घाटसावळी, ता. जि. बीड. २) संकेत पि. साधु कदम, वय-२६ वर्षे, धंदा-व्यापार,रा. घाटसावळी, ता. जि. बीड. ३) निखिल पि. साधु कदम, वय-२२ वर्षे, धंदा-शिक्षण, रा. घाटसावळी, ता.जि. बीड. ४) सखुबाई किसन कदम, वय-८३ वर्षे, धंदा-घरदगम,रा. घाटसावळी, ता. जि. बीड. विरुध्द

गैरअर्जदार :- निरंक

अर्जदार हे भारतीय आहेत

प्रकरण :- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत.

ज्याअर्थी अर्जदार यांनी मयत नामे साधु पि. किसन कदम यांचे वारस प्रमाणपत्र मिळणेबाबत या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

मयत नामे **साधु पि. किसन कदम, रा. घाटसावळी, ता. जि. बीड हे दिनांक** ०४/०२/२०२५ **रोजी घाटसावळी, ता. जि. बीड** येथे मयत झालेले आहेत. अर्जदार क्रं. १ ही मयताची पत्नी असून, अर्जदार क. २ व ३ हे मयताचे मुले आहेत. अर्जदार क. ४ ही मयताची आई आहे. अर्जदार यांच्याशिवाय मयताचे ईतर कोणीही वारस नाहीत.

अर्जदारांचे असेही म्हणणे आहे की, शासकीय कामासाठी, कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे म्हणून सदरचा अर्ज या न्यायालयात दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यांत येते की, सदरील अर्जदार हे मयताचे वारस नाहीत असे कोणास समजावयाचे असेल तर त्यांनी हे प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून एक महिन्याच्या आंत या न्यायालयात हजर होऊन आपली हरकत द्यावी. जर मुदतीत कोणीही हरकत न दिल्यास हे न्यायालय अर्जदाराचे हक्कांत त्यांचा हक्काबाबतचा पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना मयताचे वारस असल्याद्दलचे वारस प्रमाणपत्र दिले जाईल याची सर्वांनी नोंद घ्यावी.

पुढील दिनांक ०७/०५/२०२५

आज दिनांक ०३/०४/२०२५ रोजी न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.

**ॲड. शेळके वाय. आर.**

**आदेशावरून.**
**(स्वाक्षरीत)**
**अधीक्षक**
**दिवाणी न्यायालय, व. स्तर, बीड**

**(स्वाक्षरीत)**
**क.लिपीक**

**शिक्का**



**मा. ॲड.अजित एम. देशमुख, लवाद अधिकारी, लवाद न्यायाधिकरण, बीड यांचे समोर**

लवाद न्यायाधिकरण कार्यालय, "मधुमीन", डॉ.हाटवटे बिल्डींग, प्रियदर्शनी बाल उद्यानच्या पश्चिमेस, राजीव गांधी चौक, नगर रोड, बीड ता.जि. बीड (मल्टिस्टेट को-ऑपरेटिव सोसायटीज ॲक्ट 2002 व अब्रिटेशन ॲन्ड कन्सिलेशन ॲक्ट अन्वये)

**जाहीर नोटीस / समन्स** — **दि.** 05/03/2025

अर्जदार : आदर्श मल्टीस्टेट को-ऑप. क्रेडिट सोसायटी लि., परळी वै. ता. परळी वै. जि. बीड

**विरूद्ध - गैरअर्जदार**

1) लवाद अर्ज क्र. 590/2024 1) श्रीकिशनजी नंदलाल भराडीया रा. मंगळवार पेठ, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड 2) वैजनाथ रतन राठोड रा. वानटाकळी तांडा पो. नागापुर ता. परळी वै. जि. बीड 3) बळीराम पांडुरंग आंधळे रा. दौनापुर पो. नागापुर ता. परळी वै. जि. बीड

2) लवाद अर्ज क्र. 592/2024 1) दत्तात्रय किसन सोळंके 2) अर्जुन दत्तात्रय सोळंके रा. कृष्णानगर, सावतामाळी मंदिर परिसर, परळी वै. ता. परळी वै. जि. बीड 3) विठ्ठल रामभाऊ जाधव रा. देशमुख गल्ली, गणेशपार, परळी वै. ता. परळी वै. जि. बीड

3) लवाद अर्ज क्र. 593/2024 1) शिवाजी वसंत पवार रा. डोंगर पिंपळा ता. अंबाजोगाई जि. बीड 2) अनंतराव श्रीरामजी पवार रा. ज्ञानेश्वर नगर, अंबाजोगाई ता. अंबाजोगाई जि. बीड 3) सतिष भागवत पवार रा. डोंगर पिंपळा ता. अंबाजोगाई जि. बीड

(प्रत्येक प्रकरणात वर नमुद क्र. 1 हे कर्जदार तर अन्य जामीनदार आहेत.)

या नोटीस द्वारे तुम्हा वरील सर्व गैरअर्जदारांना कळविण्यात येते की, अर्जदार यांनी तुमच्या विरूद्ध वर नमुद लवाद अर्ज या कार्यालयात दाखल केले आहेत. सदर लवाद दाव्याच्या सुनावनी नोटीस आपणापैकी काहीनी घेऊन गैरहजर राहिलात. काहीनी नोटीस घेण्यास नकार दिला. तर काहींच्या नमुद पत्यावर नोटीस बजावण्यात आल्या आहेत / नाहीत. तसेच काहींच्या नोटीस तामील होत नाहीत. तरी सदर लवाद अर्जाच्या चौकशी कामी आपण दि. 11/04/2025 रोजी सकाळी 11 वा. या लवाद न्यायाधिकरण कार्यालयात तुम्ही अथवा तुमच्या वकीलांसह हजर रहावे. तुम्ही हजर न राहिल्यास या बाबत तुमचे काहीही म्हणने नाही असे समजून तुमच्या विरूद्ध लवाद अर्जाचा एकतर्फी हुकूम / आदेश करण्यात येईल. याची नोद घ्यावी.

सदर जाहीर नोटीस / समन्स माझ्या सही व शिक्क्यांची दिले आहे.

ॲड.अजित एम. देशमुख
लवाद अधिकारी, बीड.

CMYK

दैनिक
● epaper.marathwadapatra.com

# मराठवाडा पत्र

बुधवार, दि.०९ एप्रील २०२५


## आज बालाजी मंदिर येथे संजय गांधी, श्रावणबाळ योजना डीबीटी शिबिराचे आयोजन : अमर नाईकवाडे

**बीड । प्रतिनिधी**

तहसील कार्यालयामध्ये श्रावण बाळ, संजय गांधी योजनेतील वयोवृद्ध व अपंग लाभार्थ्यांची डीबीटी करण्यासाठी रोज गर्दी होत आहे. तहसील कार्यालयातील गर्दी व वाढते तापमान पाहता व पेठ विभागापासून तहसीलचे अंतर हे जास्त आहे, त्यामुळे काही अपंग व वयोवृद्ध लाभार्थ्यांची एवढ्या लांब जाण्याची सोय व परिस्थिती नाही. या कारणाने वरील सर्व परिस्थितीचे गांभीर्य पाहता तहसीलदार चंद्रकांत शेळके व नायब तहसीलदार प्रशांत जाधवर यांच्याशी समन्वय साधून मुख्यमंत्री लाडकी बहीण योजनेचे विधानसभा अध्यक्ष तथा नगरसेवक अमर नाईकवाडे यांनी बुधवार दिनांक ९ एप्रिल २०२५ रोजी सकाळी १० ते दुपारी ४ या वेळेत शिबिराचे आयोजन केलेले आहे. गरजू लाभार्थ्यांनी सदरील शिबिराचा लाभ घेण्याचे आवाहन देखील ▶▶ उर्वरित पान २ वर

# आसरडोह गावाला क्षयरोगमुक्त गावचा राष्ट्रीय पुरस्कार

## जिल्हाधिकारी कार्यालयात सरपंच, ग्रामपंचायत अधिकारी व आरोग्य पथकाचा गौरव



**किल्लेधारूर। प्रतिनिधी**

धारूर तालुक्यातील आसरडोह या गावाने क्षयरोगावर यशस्वी मात करत 'क्षयरोगमुक्त गावं हा बहुमान पटकावला आहे. या उल्लेखनीय कामगिरीबद्दल आज, ७ एप्रिल रोजी जिल्हाधिकारी कार्यालयात एका विशेष समारंभाचे आयोजन करण्यात आले होते. या सोहळ्यात गावाला क्षयरोगमुक्ततेचा राष्ट्रीय स्तरावरील पुरस्कार प्रदान करण्यात आला.

या गौरवशाली क्षणी आसरडोहचे सरपंच मंगल देशमुख सरपंच ग्रामपंचायत अधिकारी आणि आरोग्य पथकातील सर्व सदस्य उपस्थित होते. जिल्हाधिकाऱ्यांच्या हस्ते त्यांना प्रशस्तिपत्र आणि स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. गावाने लोकसहभाग आणि आरोग्य विभागाच्या अथक प्रयत्नातून हे यश संपादन केले आहे. नियमित तपासण्या, जनजागृती मोहीम आणि प्रभावी उपचार पद्धतींच्या अवलंबामुळे गावाला क्षयरोगमुक्त घोषित करणे शक्य झाले, असे यावेळी बोलताना सरपंच पुत्र रवी देशमुख यांनी सांगितले. त्यांनी ग्रामपंचायत सदस्य, आरोग्य कर्मचारी आणि गावकऱ्यांच्या एकत्रित प्रयत्नांचे कौतुक केले.

ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी सांगितले की, या यशासाठी आरोग्य विभागाने वेळोवेळी मार्गदर्शन केले आणि आवश्यक सुविधा पुरवल्या. त्यामुळे गावकऱ्यांमध्ये आरोग्यविषयक जागरूकता वाढण्यास मदत झाली. जिल्हाधिकाऱ्यांनी आसरडोह गावाच्या या प्रशंसनीय कामगिरीबद्दल अभिनंदन केले. ते म्हणाले की, इतर गावांसाठी आसरडोह एक आदर्श उदाहरण आहे. आरोग्य विभागाने याच पद्धतीने कार्य करून जिल्ह्यातील इतर गावेही क्षयरोगमुक्त करावीत, असे आवाहन त्यांनी केले. या पुरस्कारामुळे आसरडोह गावासह संपूर्ण तालुक्यात आनंदाचे वातावरण पसरले आहे. गावकऱ्यांनी या यशाबद्दल सरपंच, ग्रामपंचायत आणि आरोग्य पथकाचे अभिनंदन केले आहे

## आईच्या वाढदिवसानिमित्त मुलांने उभारली पाणपोई




**किल्लेधारूर। प्रतिनिधी**

धारूर शहरातील सामाजिक कार्यात अग्रेसर असणारे नितीन शुक्ला यांनी आपल्या मातोश्री शांतादेवी नरेंद्रप्रसाद शुक्ला यांचा ६ एप्रिल रोजी वाढदिवस असून या वाढदिवसानिमित्त त्यांनी बाजारतळ या ठिकाणी येणार्या नागरिकांसाठी मोफत पाण्याची सोय केली असून पाणपोई उभारली आहे त्यांच्या या सामाजिक कार्याचे सर्वत्र कौतुक होत आहे. सध्या उन्हाळ्याचे दिवस आहेत मोठ्या प्रमाणावर सूर्य आग होत आहे उणाच्या तीव्रतेमुळे माणसाला जास्तीचे पाणी पिण्यासाठी लागत आहे अशात परगावहून बाजारासाठी व इतर वस्तू खरेदीसाठी येणार्या नागरिकांना उन्हाचा मोठा त्रास होताना दिसून येत आहे त्यामुळे अशा लोकांची पिण्याच्या ▶▶ उर्वरित पान २ वर

## कोळेश्वरच्या विद्यार्थ्यांनी फुलविली परसबाग

### सेंद्रिय पद्धतीने पिकवलेल्या भाजीपाल्याचा मध्यान्ह आहारासाठी होतोय वापर

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई तालुक्यातील कोळगांव येथील नूतन कोळेश्वर विद्यालयातील राष्ट्रीय हरित सेनेच्या विद्यार्थ्यांनी वृक्ष व पक्षी संवर्धनाबरोबरच शाळेतील सांडपाण्याचा पूनरवापर करून शाळेमध्ये रासायनीक खते व औषधांचा वापर न करता नैसर्गिक सेंद्रिय पद्धतीने परसबाग फुलवून विषमुक्त भाजीपाला निर्मिती प्रकल्प तयार केला. दरम्यान या नैसर्गिक सेंद्रिय पद्धतीने फुलविलेला भाजीपाल्याचा शाळेच्या मध्यान्ह आहारासाठी ▶▶ उर्वरित पान २ वर



## बीड जिल्ह्याचे नाव आरोग्य विभागात महाराष्ट्र राज्यात प्रथम आणणारे नेत्र विभागाचे डॉक्टर राधेश्याम जाजू यांचा गौरव

### बीड जिल्हा शिवसेना परिवाराच्या वतीने सत्कार सोहळा संपन्न

**बीड । प्रतिनिधी**

जागतिक आरोग्य दिनानिमित्त ७एप्रिल रोजी राज्यातील सर्वोत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या तत्कालीन जिल्हा शल्यचिकित्सक डॉक्टर अशोक थोरात यांच्या मार्गदर्शनाखाली व अंधत्व निवारण व मोतीबिंदू शस्त्रक्रिया केल्याबद्दल बीडचे जिल्हा नेत्र विभागाचे आरोग्य अधिकारी *डॉ . राधेश्यामजी जाजू व त्यांच्या टीम ने ग्रामीण भागातील रुग्णालयात जाऊन संपूर्ण नेत्रदीपक कामगिरी करून महाराष्ट्रात प्रथम क्रमांक पटकावला आहे*.दिनांक ०७ एप्रिल, २०२५ रोजी जागतिक आरोग्य दिनी यशवंतराव चव्हाण सभागृह,मुंबई येथे कार्यक्रम संपन्न झाला. त्याबद्दल गौरवण्यात




आले त्याबद्दल शिवसेना व धांडे परिवाराच्या वतीने डॉक्टर राधेशाम जाजू यांचा यथोचित सत्कार शिवसेनेचे जिल्हा संघटक नितीन भैया धांडे यांच्या हस्ते सत्कार सोळा संपन्न झाला.यावेळी बीड जिल्हा आरोग्य अधिकारी स्त्री रोग तज्ञ डॉ.नारायण गाडे, डॉ.संजय जाणवळे, उपजिल्हाप्रमुख हनुमान ▶▶ उर्वरित पान २ वर

## अस्सल मराठवाडी भाषेत रंगणार चकलांब्यात वस्त्रहरण

### चैत्र पौर्णिमेनिमित्त श्री रोकडेश्वर जयंतीची जय्यत तयारी

**बीड । प्रतिनिधी**

गेल्या १४१ वर्षापासून अखंडितपणे पारंपारिक पद्धतीने चकलांबा या गावात चैत्र पौर्णिमेनिमित्त श्री रोकडेश्वर जयंती साजरी केली जाते यानिमित्त श्री रोकडेश्वर प्रसादिक नाट्य मंडळाचा नाट्य प्रयोग आयोजित केला जातो तीन दिवशीय असलेल्या या उत्सवासाठी रसिक प्रेक्षकांनी आणि भाविकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे



असे आवाहन ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे

चकलांबा या गावात गेल्या १४१ वर्षापासून अखंडितपणे चैत्र पौर्णिमेच्या दिवशी सामाजिक कौटुंबिक ऐतिहासिक अशा विविध विषयावर नाट्यप्रयोगाचे आयोजन केले जाते विशेष म्हणजे हा नाट्य प्रयोग गावातील नाट्यकलाकारच मोठ्या तयारीने सादर करत असतात आणि ग्रामस्थांच्या वतीने ही या नाट्यप्रयोगाला मोठा प्रतिसाद मिळतो यावर्षी दिनांक ११ एप्रिल रोजी छबिना होणार असून यानिमित्त श्री रोकडेश्वर महाराजांची गावातून पालखी मिरवणूक काढली जाणार आहे तर रात्री उशिरापर्यंत गावातील तरुणांच्या सहभागातून गंगेचे पाणी कावडीद्वारे आणून गावातील मंदिरात जलाभिषेक केला जातो, दिनांक १२ एप्रिल रोजी सूर्यो दयाच्या समयी जयंती साजरी केली जाते तर दुपारी एक ते चार यादरम्यान महाप्रसादाचे आयोजन केले जाते पारंपारिक पद्धतीने चिठ्ठी टाकून यजमान निवडले ▶▶ उर्वरित पान २ वर

## आदित्य फार्मसिच्या विद्यार्थ्यांची आनंदग्रामला भेट

### शैक्षणीक भेटी दरम्यान ६२ विद्यार्थ्यांना कडधान्यासह केले फळ वाटप

**बीड । प्रतिनिधी**

आदित्य शिक्षण संस्थेच्या



आदित्य फार्मसिच्या विद्यार्थ्यांनी भारतीय औषधनिर्माणशास्त्र संस्थेच्या अभ्यासक्रमानुसार बीड शहरापासून जवळ असलेल्या आनंदग्राम या संस्थेला भेट दिली. यावेळी तेथील अनाथ ६२ मुलांना कडधान्यासह फळ वाटप करण्यात आले. भारतीय औषधनिमणशास्त्र संस्थेच्या अभ्यासक्रमानुसार अनाथ आश्रम भेट देण्याकरिता व मुलांना कडधान्य आणि फळ वाटप करण्यासाठी आदित्य शिक्षण संस्थेचे मुख्य प्रवर्तक सुभाषचंद्र सारडा, संचालक डॉ.आदित्य सारडा, वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ परभणीच्या कार्यकारी सदस्या तथा आदित्य शिक्षण ▶▶ उर्वरित पान २ वर




## अखेर लिंबागणेश येथील स्मशानभूमीचे काम पुर्णत्वाकडे

### स्मशानभूमीत सरण रचुन केलेल्या ठिय्या आंदोलनाचे यश : डॉ. गणेश ढवळे

**लिंबागणेश । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील लिंबागणेश येथील १२ ते १४ वर्षापुर्वी बांधण्यात आलेल्या स्मशानभूमीचे ढासळलेल्या अवस्थेतील बांधकाम आणि उडुन गेलेले पत्रे यामुळे दुरावस्था झाली होती त्यामुळे पावसाळ्यात अंत्यसंस्कार करण्यासाठी मोठी अडचण निर्माण होऊन मृतदेहाची हेळसांड होत होती. नविन स्मशानभूमी बांधण्यात यावी यासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉ.



गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सहकारी विक्रांत वाणी,कृष्णा वायभट,आरूण ढवळे यांनी ढासळलेल्या बांधकामावरच सरण रचुन ठिय्या आंदोलन केले होते. त्याची दखल घेत आ.संदिप क्षीरसागर यांनी जिल्हा वार्षिक (दहन/ दहनभुमी) जनसुविधा विशेष अनुदान योजनेंतर्गत मुलभूत सुविधांसाठी सन २०२२-२३ आर्थिक वर्षाकरीता ग्रामपंचायत लिंबागणेश येथे स्मशानभूमी बांधकाम व सुशोभीकरणासाठी ८ लक्ष रुपयांचा निधी मंजूर करत प्रशासकीय मान्यता दिली होती. आता काम पुर्णत्वाकडे गेले असुन नविन स्मशानभूमी पावसाळ्यात होणारी मृतदेहाची हेळसांड थांबणार असल्याने ग्रामस्थांनी याबद्दल समाधान व्यक्त केले असुन उर्वरित पेलव्हिक ब्लॉक,पाण्याचा हौद, संरक्षक भिंत आदी कामांसाठी पाठपुरावा करणार आहोत.

मृतदेह तहसील कार्यालयात आणण्याच्या घटनात वाढ; प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधींना सोयरंसुतक नाही

बीड जिल्ह्यातील १३९४ गावातील स्मशानभूमीची दुरावस्था असुन ६५६ लहान मोठ्या गावात स्मशानभूमीची सोयच नाही. त्यामुळे पावसाळ्यात मृतदेहाची हेळसांड याबरोबरच अंत्यसंस्कार रोखल्याने गावात वादविवाद होण्याच्या घटना घडत आहेत. काल दि.७ सोमवार रोजी धारूर तालुक्यातील थेटेगव्हाण येथील भिल्ल समाजातील संजय नामदेव माळी यांचा मृतदेह धारूर तहसील कार्यालयासमोर ३ तास ठेवण्यात आला होता. यापुर्वीही केज तालुक्यातील सोनेसांगवी( सुर्डी) येथील ४ महिन्यात ३ मागासवर्गीय महिलांचा अंत्यसंस्कार रोखल्याने तहसील कार्यालयात मृतदेह आणुन ठेवला होता.तर गेवराई तालुक्यातील सुशी वडगाव येथे ग्रामपंचायत कार्यालयासमोर मृतदेह ठेवण्यात आला होता तर बीड तालुक्यातील पालवण याठिकाणी अंत्यसंस्कार रोखल्याने भांडणे होऊन अट्रसिटी कायद्यांतर्गत गुन्हे दाखल करण्यात आले होते. गेल्या ३ वर्षांपासून आम्ही शासन दरबारी निवेदने तसेच लक्ष्यवेधी आंदोलनाद्वारे स्मशानभूमीची सोय करण्याची मागणी करत आहोत.परंतु प्रशासकीय अधिकारी आणि लोकप्रतिनिधी यांना याचे सोयरसुतक नसल्याचे दिसून येते.अशी संतप्त प्रतिक्रिया डॉ.गणेश ढवळे यांनी बोलून दाखवली.

CMYK